# महाराष्ट्र शासन

उद्योग संचालनालय,

नवीन प्रशासन भवन, मध्यवर्ती भांडार खरेदी संघटना, मुंबई-४०० ०३२.

आदेश क्रमांक. उसं/भांखस/खुर्च्या दुरुस्ती/दरनिश्चिती/(६०)/२०१७-१८/ ६ - 8243

दिनांक:- 23 NOV 2017

**वाचा :-१) शासन निर्णय उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग क्र. भांखस -२०१४/प्र.क्र.८२/भाग-III/ उद्योग -४, दि.०१/१२/२०१६**

**२) मध्यवर्ती भांडार खरेदी समितीची बैठक दि. १३/१०/२०१७ चे इतिवृत्त**

शासकीय विभागांनी करावयाच्या कार्यालयीन खरेदीसाठीच्या कार्यपध्दतीची सुधारित नियमपुस्तिका दि.०१/१२/२०१६ मधील परिच्छेद ५.१५ नुसार परिशिष्ट-१८ मध्ये अंध व अपंग संस्थानी उत्पादीत केलेल्या वस्तूंना आरक्षण देण्यात आले आहे. सदर संस्थांनी उत्पादीत केलेल्या वस्तुंची दरनिश्चिती मध्यवर्ती भांडार खरेदी समितीमार्फत करण्यात येते. त्यानुसार **"खुर्च्या दुरुस्ती"** या बाबीची सन २०१७-१८ या वर्षासाठी दरनिश्चिती करण्यासाठी खालील संस्थांनी सादर केलेल्या प्रस्तावानुसार, मध्यवर्ती भांडार खरेदी संघटनेच्या भांडार खरेदी समितीने दि.१३/१०/२०१७ रोजीच्या बैठकीत **"खुर्च्या दुरुस्ती"** या बाबीचे सन २०१६-१७ मध्ये निश्चित केलेले दर कायम ठेवण्याचा निर्णय घेण्यात आलेला आहे. खुर्ची दुरुस्ती या बाबीचे निश्चित केलेले दर परिशिष्ट **"अ"** येथील तक्त्यामध्ये दर्शविल्याप्रमाणे आहेत. सदर दर हे खालील संस्थांसाठी निश्चित करण्यात आले आहेत.

१) मे. ब्लाईंड मेन्स इंडस्ट्रीयल को-ऑ. प्रोडयुसर्स सोसायटी लि. विक्रोळी (पश्चिम), मुंबई .

२) मे. दिपक इंडस्ट्रियल को-ऑप. सोसायटी लि., चेंबूर मुंबई.

३) मे. दि. नेशनल सोसायटी फॉर द वेल्फेअर ऑफ द फिजिकल हॅन्डीकॅप्ड, ठाणे.

४) मे.नॅशनल असोसिएशन फॉर द ब्लाईंड (महाराष्ट्र युनिट),नाशिक.(नाशिक महानगर पालिका क्षेत्रापुरतेच)

सदर दरनिश्चितीची विधिग्राहयता दि.३०/०४/२०१८ पर्यंत ग्राहय राहील. सदरचे दर सर्व कर समाविष्टित असून त्यात वस्तू व सेवा कराचा (GST) समावेश आहे. सदर दर खरेदीदाराच्या कार्यालयापर्यंत मोफत पोहोच असे आहेत.

शासनाच्या आरक्षित संस्थांनी संस्थेच्या अंध व अपंग सभासद व्यक्तीकडूनच शासकीय कार्यालयानी दिलेले कामे पुर्ण करुन घ्यावीत.

**पुरवठा कालावधी :-** मागणीपत्र मिळाल्यापासून ०६ आठवड्याच्या आत खुर्ची दुरुस्तीची कामे पुर्ण करणे आवश्यक राहील.

**देय रक्कमेबाबतच्या अटी :-** मागणीकार कार्यालयाने खुर्ची दुरुस्तीची कामे पुर्ण झाल्यावर कामाचे त्वरीत निरीक्षण करावे. निरीक्षणात मालामध्ये आढळलेल्या उणीवा/ त्रुटी/ दोष ताबडतोब पुरवठादारांच्या व

मध्यवर्ती भांडार खरेदी संघटनेच्या / खरेदी समितीच्या नजरेस आणाव्यात. ही कार्यवाही काम पूर्ण झालेच्या तारखेपासून १५ दिवसात करण्यात यावी. मालाचा निरीक्षण अहवाल प्राप्त झाल्यानंतर व तपासणी केल्यानंतर ९०% रक्कम ०२ आठवडयामध्ये संस्थाना द्यावी व उर्वरित १०% रक्कम सर्व कामे पुरवठा आदेशानुसार सुस्थितीत व विनिर्देशांप्रमाणे झाल्यानंतर ३० दिवसांपर्यंत करणे आवश्यक राहील. पुरवठा कालावधीमध्ये खुर्ची दुरुस्तीची कामे पुर्ण न झाल्यास उशीरा खुर्ची दुरुस्ती केलेल्या कामांच्या किंमतीवर ०.५% प्रती आठवड्या प्रमाणे दंड मागणीकार कार्यालयामार्फत आकारला जाईल व त्याची कमाल मर्यादा खालीलप्रमाणे असेल.

अ) विहित कार्य कालावधी मध्ये पुर्ण न केलेल्या कामाची किंमत दोन लाखापेक्षा कमी असेल तर अशा किंमतींच्या १०% दंड आकारला जाईल.

ब) विहित कार्य कालावधी मध्ये पुर्ण न केलेल्या कामाची किंमत दोन लाखापेक्षा जास्त असेल तर अशा किंमतीच्या ५% दंड आकारला जाईल.

सदरील दंडाची वसूली करण्याची संपूर्ण जबाबदारी मागणीकार कार्यालयाची असेल. खुर्ची दुरुस्ती कामाच्या गुणवत्तेबाबतची तपासणी मागणीकार कार्यालयाने आवश्यकतेनुसार करावी.

सदर संस्थांनी शासकीय कार्यालयात केलेल्या खुर्ची दुरुस्ती कामाचा अहवाल प्रत्येक महिन्याला मध्यवर्ती भांडार खरेदी संघटनेस सादर करावा.

**उद्योग सह संचालक (भां.ख.)**
**विकास आयुक्त (उद्योग) यांचेकरीता.**

**प्रति,**

१) मे. ब्लाईंड मेन्स इंडस्ट्रीयल को-ऑ. प्रोडयुसर्स सोसायटी लि. विक्रोळी, २२/६८६, महाराष्ट्र हौसिंग बोर्ड, टागोर नगर, विक्रोळी, मुंबई .

२) मे. दिपक इंडस्ट्रियल को-ऑप. सोसायटी लि., दुकान नं. ५४, वत्सलाताई नाईक नगर, श्री राजेश्वर मेडिकल समोर, स.गो.बर्वे मार्ग, चेंबूर, मुंबई-४०० ०७१.

३) मे. दि. नेशनल सोसायटी फॉर द वेल्फेअर ऑफ द फिजिकल हॅन्डीकॅप्ड, बीबी-१२, राज दर्शन दादा पाटील वाडी, प्लॅट फॉर्म क्र.१ जवळ ठाणे(पश्चिम)-४०० ६०२

४) मे.नॅशनल असोसिएशन फॉर द ब्लाईंड (महाराष्ट्र युनिट), यशवंत मंडई, ३ रा. मजला, रविवार कारंजा, नाशिक. (नाशिक महानगरपालिका क्षेत्रापुरतेच)

५) निवड नस्ती.

परिशिष्ट "अ"

सन २०१७-१८ या वर्षासाठी "खुर्च्या दुरुस्ती" या बाबीची दरनिश्चिती.
(सदर निश्चितीतील दर हे दि. ३०/०४/२०१८ पर्यंत ग्राहय राहतील.)

| अ.क्र. | दरनिश्चिती बाबीचे नाव | सन २०१७-१८ करिता निश्चित केलेले दर (रूपये) |
|---|---|---|
| १. | २. | ३. |
| **अ)** | **लाकडी खुर्ची दुरुस्ती** | |
| १. | किरकोळ खुर्ची दुरुस्ती (लाकडी) | १५.०० प्रत्येकी |
| २. | खुर्चीची सर्वसाधारण दुरुस्ती (लाकडी) | ४६.०० प्रत्येकी |
| ३. | खुर्चीला नवीन हात बसविणे (लाकडी) | ४२.०० प्रत्येकी |
| ४. | खुर्चीला नवीन पुढील पाय बसविणे (लाकडी) | ६३.०० प्रत्येकी |
| ५. | खुर्चीला पाठी मागची नविन बाजू बसविणे (लाकडी) | ६२.०० प्रत्येकी |
| ६. | खुर्चीला केनपट्टी नविन बसविणे (लाकडी) | ३४.०० प्रत्येकी |
| ७. | खुर्चीला खालील नवीन पट्टी बसविणे (लाकडी) (फुट रेस्ट) | ३६.०० प्रत्येकी |
| ८. | खुर्चीला बाजूस नविन पट्टी बसविणे (लाकडी) | ३५.०० प्रत्येकी |
| ९. | खुर्चीला मजबुती करिता ०३ इंचाची नविन पट्टी बसविणे (लोखंडी) | ०६.५० प्रत्येकी |
| १०. | खुर्चीला मागील पाय बसविणे (फुल लेग) | ६३.०० प्रत्येकी |
| **ब)** | **रिव्हॉल्वींग खुर्ची दुरुस्ती** | |
| १. | बॉल कॅस्टर बसविणे | ६३.०० प्रत्येकी |
| २. | रिपेरिंग, ऑयलिंग, क्लीनींग | ४२.०० प्रत्येकी |
| ३. | खुर्चीस रंगकाम करणे | ५९.०० प्रत्येकी |
| **क)** | **लोखंडी खुर्ची दुरुस्ती** | |
| १. | किरकोळ दुरुस्ती (स्क्रुसहित) | २८.०० प्रत्येकी |
| २. | चौकट बदलणे (बैठकीची अथवा पाठी मागची बाजू) (नविन) | १३४.०० प्रत्येकी |
| ३. | हात बदलणे (लाकडाचा हात बसविणे) स्टिल चेअर हॅण्डल मॉडेल्ड | ५२.०० प्रत्येकी |
| ४. | संपुर्ण खुर्चीस रबर बुश बसविणे | ३४.०० प्रत्येकी |
| ५. | अधिकाऱ्यांचा फिरत्या खुर्चीचे चाके बदलणे | ६४.०० प्रत्येकी |
| ६. | अधिकाऱ्यांच्या खुर्चीची जोडणी करणे (वेल्डींग) | १०८.०० प्रत्येकी |
| ७. | रंगकाम करणे | ६४.०० प्रत्येकी |
| ८. | पार्टिशनला पॉलीश करणे (प्रति चौ. फुट) | ०७.०० प्रत्येकी |
| ९. | खुर्चीस नट बोल्ट बसविणे | ०७.०० प्रत्येकी |
| १०. | कुशन / साधी खुर्ची दुरुस्ती करणे | १३१.०० प्रत्येकी |
| ११. | लोखंडी खुर्चीला वेल्डींग करणे | ३६.०० प्रत्येकी |

| अ.क्र. | दरनिश्चिती बाबीचे नाव | सन २०१७-१८ करिता निश्चित केलेले दर (रूपये) |
|---|---|---|
| १. | २. | ३. |
| १२. | फिरत्या खुर्चीला मशिनसह नविन स्टॅण्ड बसविणे | ८२०.०० प्रत्येकी |
| १३. | खुर्चीला मागील पट्टी / बाजूची पट्टी बसविणे | ३६.०० प्रत्येकी |
| १४. | खुर्चीचे पाय बसविणे (एकास) | ३६.०० प्रत्येकी |
| १५. | खुर्चीला रबर बसविणे | ०६.५० प्रत्येकी |
| १६. | खुर्चीला बैठक / पाठीला प्लायवुड बसविणे (प्रति चौ. फुट) | ४७.०० प्रति चौ. फुट |
| १७. | खुर्चीचे विणकाम (फिरत्या खुर्चीची बैठक/ मागील बाजू विणकाम) | १४३.०० प्रत्येकी |

**उद्योग सह संचालक (भां.ख.)**
**विकास आयुक्त (उद्योग) यांचेकरीता.**